विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक २८

भारतीय युद्धघटनांचा शास्त्रीयदृष्ट्या कालनिर्णय

प्रस्तुत पुस्तकाच्या विद्वान् लेखकांनी विविध प्रमाणांवरून असे सिद्ध केले आहे की भारतीय युद्ध कार्तिक अमावास्येस ज्येष्ठा नक्षत्रावर सुरू होऊन मार्गशीर्ष वद्य तृतीयेस समाप्त झाले. तसेच भगवद्‌गीता मार्गशीर्ष शुक्ल एकादशीलाच, पण युद्धाच्या अकराव्या दिवशी, सांगितली गेली.

लेखक
वा. वि. भागवत

किंमत तीन रुपये

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला क्रमांक २८

भारतीय युद्धघटनांचा शास्त्रीयदृष्ट्या कालनिर्णय

डॉ. वा. वि. भागवत
माजी प्राचार्य, होळकर सायन्स कॉलेज, इंदूर

१९७४

प्रकाशक

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

किंमत तीन रुपये

प्रकाशक :

डॉ. मु. बा. देवपुजारी

कार्यवाह, विदर्भ संशोधन मंडळ,
नागपूर

या पुस्तकाच्या प्रती खालील ठिकाणी मिळतील.

(१) विदर्भ संशोधन मंडळ, पश्चिम हायकोर्ट मार्ग, नागपूर–१०

(२) डॉ. वा. वि. सुभेदार, ८/अ, वासुदेव नगर, इंदूर

मुद्रणस्थळ :

नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर.

प्राक्कथन

भारतीय युद्ध कोणत्या तिथीस सुरू झाले आणि ते किती दिवस चालले या विषयी विद्वानांत भिन्न भिन्न मते प्रचलित आहेत. या वादग्रस्त विषयावरचा प्रा. ग. वा. कवीश्वरांचा लेख तीन वर्षांपूर्वी आम्ही 'मंडळ वार्षिक १९७०' मध्ये प्रसिद्ध केला होता. तो स्वतंत्र पुस्तकरूपाने उपलब्ध आहे.

इंदूरचे विख्यात शास्त्रज्ञ डॉ. वा. वि. भागवत यांनीही या विषयाचे संशोधन केले असून त्यांचा तद्विषयक संक्षिप्त लेख आम्ही 'मंडळ वार्षिक १९७३' मध्ये प्रसिद्ध केला आहे. तो अभ्यासकांस उपलब्ध व्हावा म्हणून स्वतंत्र पुस्तिकारूपाने प्रकाशित करीत आहो. अभ्यासक त्याचे स्वागत करील अशी आशा आहे.

नागपूर
फाल्गुन पौर्णिमा
शक संवत १८९५
७ मे १९७४

वा. वि. मिराशी
कार्याध्यक्ष,
विदर्भ संशोधन मंडळ.

भारतीय युद्ध घटनांचा शास्त्रीय दृष्ट्या कालनिर्णय

डॉ. वा. वि. भागवत, इंदूर

भारतीय युद्ध–घटनांची कालमर्यादा

भारतीय युद्धासंबंधाचा काल श्रीकृष्ण–शिष्टाईपासून भीष्म निर्वाणा-पर्यंत मोजला पाहिजे. शिष्टाईसाठी श्रीकृष्ण 'कौमुदे' मासी रेवती नक्षत्रावर निघाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. येथे 'कौमुदे' म्हणजे 'कार्त्तिक महिन्यात' असा अर्थ होतो. टीकाकारांनी हाच अर्थ दिला आहे. शिवाय ज्या वेळेस कौरव व पांडव सैन्य लढावयास सज्ज झाले होते त्या वेळच्या व्यासांच्या तोंडच्या एका श्लोकांत 'कार्त्तिक' महिन्याचे नाव आले आहे.

अलक्ष्यः प्रभया हीनः पौर्णमासीं च कार्त्तिकीम् ।

उ. प., ८१–७ (भांडारकर)

(गेल्या कार्त्तिक पौर्णिमेला चंद्र निस्तेज असल्यामुळे दिसत नव्हता)

'कौमुदी' म्हणजे 'आश्विन' किंवा 'कार्त्तिक' पौर्णिमेचा चंद्र प्रकाश. तेव्हा काहींनी[१] 'कौमुदे मासि' म्हणजे 'आश्विन' महिन्यात असा अर्थ केला आहे तो अर्थातच चूक आहे. तसेच भीष्माचे निर्वाण त्याच्या पतनानंतर अठ्ठावन दिवसांनी झाले ह्याबद्दल मुळीच वाद नाही.

अष्टपंचाशतं रात्र्यः शयानस्याद्य मे गताः ।

अनु. प. १५३–२७ (भांडारकर इन्स्टिटयूटची आवृत्ति)

---

१. प्रा. अण्णासाहेब आठवले. 'कौरव–पांडव–युद्ध', पान २२.

माघोयं समनुप्राप्तो मासः सौंम्यः युधिष्ठिर ।

अनु. प., १५३-२८ (भांडारकर)

तेव्हा 'कौमुद' म्हणजे आश्विन मानल्यास भीष्म-पतन ते भीष्म-निर्वाण पर्यंत ८८ दिवस होतील, ते शक्य नाही. तेव्हा 'कौमुद' म्हणजे 'कार्त्तिक'च. म्हणून भारतीय युद्ध घटनांची कालमर्यादा कार्त्तिक ते माघ मानावयास हरकत नाही.

ज्योतिर्गणिताचे ठोकळ नियम

वरील कालमर्यादित युद्ध घटनांचे जे श्लोक आहेत, त्यांतील काल ज्योतिर्गणिताप्रमाणे बसले तरच ते बरोबर मानता येतील. या कालात कार्त्तिक, मार्गशीर्ष, पौष व माघ हे महिने येतात. ज्योतिर्गणिताप्रमाणे यांच्या पौर्णिमा सामान्यतः कृत्तिका, मृग, पुष्य व मघा नक्षत्राच्या आस-पास यावयास पाहिजेत. तसेच पंधरा दिवसांनी येणाऱ्या अमावास्या साधारणतः ज्येष्ठा, पूर्वाषाढा, धनिष्ठा व पूर्वाभद्राच्या जवळ यावयास हव्यात. या पौर्णिमा व अमावास्या कोणत्या नक्षत्राच्या पलीकडे जाऊ शकत नाहीत हे काढता येते. उदाहरणार्थ, अमान्त कार्त्तिक अमावास्या चित्रा नक्षत्राला, मार्गशीर्ष अमावास्या 'अनुराधा' नक्षत्राला, अथवा हीच अमावास्या 'श्रवण' नक्षत्राला असंभाव्य आहे.

ज्योतिष शास्त्राचा एक मोठा ठोकळ नियम[२] हा की कोणतीही पौर्णिमा अथवा अमावास्या ज्या तारखेस असेल तीच तारीख एकोणीस वर्षांनी आवर्तित होते. हाच नियम विस्तृत करून असेही म्हणता येईल की जे नक्षत्र एखाद्या महिन्याच्या विशिष्ट पक्षात एकोणीस वर्षांत एखाद्या तिथीच्या पुढे आढळत नसेल तर ते त्या तिथीच्या पुढे कधीच आढळणार नाही. एवढ्याने समाधान न झाल्यास मागील शंभर वर्षांची पंचांगे पाहून म्हणजे पांच आवर्तने पाहून खात्री करून घेता येते. असे केल्याने ज्योतिर्गणिताच्या साह्याने केलेल्या कालनिर्णयास निश्चितता येते. उदाहरणार्थ, 'श्रवण' नक्षत्र पौष शुक्ल पक्षात चतुर्थीच्या पुढे

---

२. प्रा. र. वि. वैद्य 'भारतीय युद्धकालनिर्णय', पान ३९.

जात नाही हे यावरून कळते. माघ महिन्यात सूर्य श्रवण नक्षत्राला नवमीनंतर येत नाही.

पंचांगावरून हेही समजते की ज्या पक्षात पुरते पंधरा दिवस नसतात त्यात नक्षत्राचा लोप होऊ शकतो, पण एकूण वृद्धी मात्र असंभाव्य आहे. पंचांगातील तिथी व नक्षत्र लोप सूर्योदयावर अवलंबून असतात. प्रत्यक्षात तीनशे साठ दिवसांच्या वर्षात चांद्रवर्ष साधारणतः तीनशे चौपन दिवसाचे असल्याने सहा दिवसांचा लोप होतो व नक्षत्र वर्ष तीनशे अठ्ठावीस दिवसांचे असल्यामुळे व नक्षत्रे सत्तावीस असल्याने नक्षत्रांची वृद्धी करावी लागते. तीनशे अठ्ठावीस दिवसांत चार नक्षत्रांची वृद्धी होईल.

कालमर्यादा ठरविण्याचे दोन निश्चित बिंदू

ज्याप्रमाणे तापक्रम मोजण्यासाठी थर्मामीटरवर प्रथम दोन बिंदू निश्चित करावे लागतात तसेच भारतीय युद्ध–घटनांचा काल ठरविण्यास जर आपणांस दोन घटनांचे काल निश्चित करता आले तर हे कार्य अचूक करता येईल. यासाठी श्रीकृष्ण व कर्ण यांच्या भाषणातील—

‘सप्तमात् चापि दिवसात् अमावास्या भविष्यति ।
संग्रामो युज्यतां तस्यां तामाहुः शक्रदेवताम् ॥

उ. प., १४०–१८ (भांडारकर)

हा श्लोक व भीष्म–निर्वाणाचे—

अष्टपंचाशतं रात्र्यः शयनस्याद्य मे गताः ।
शरेषु निशिताग्रेषु यथा वर्षशतं तथा ॥

अनु. प., १५३–२७ (भांडारकर)

माघोयं समनुप्राप्तो मासः सौम्यः युधिष्ठिर ।
त्रिभागशेषः पक्षोयं शुक्लो भवितुमर्हति ॥

अनु. प., १५३–२८ (भांडारकर)

शुक्लपक्षस्य अष्टम्यां माघमासस्य पार्थिव ।
प्राजापत्ये च नक्षत्रे मध्यं प्राप्ते दिवाकरे ॥

(प्रक्षिप्त मानलेला)

अर्जुनेन हतो भीष्मो माघमासे सिताष्टमी ।

(भारत सावित्री)

श्लोक उपयुक्त आहेत. हे दोन काल एकदा निश्चित केले म्हणजे बाकीच्या घटनांचे काल यांच्या अनुरोधाने अचूक ठरविता येतील.

कालमर्यादेचा पहिला निश्चित बिंदू

श्रीकृष्ण कार्त्तिक महिन्यात रेवती नक्षत्रावर शिष्टाईसाठी निघाले हे वर सांगितले आहे. हे नक्षत्र कार्त्तिक महिन्यांत शुक्ल पक्षात एकादशीनंतर येते. हस्तिनापुरास पोहचल्यावर त्यांनी पुष्य नक्षत्रावर राज्यसभेत भाषण दिले हे त्या सभेत दुर्योधनाने आपल्या मांडलिक राजांस उद्देशून जे उद्गार काढले त्यावरून स्पष्ट आहे.

प्रयाध्वं वै कुरूक्षेत्रं पुष्येद्येति पुनः पुनः ।

उ. प. १४८–३ (भांडारकर)

पूर्वी कार्त्तिक शुक्लाचा उल्लेख आला असल्यामुळे हे पुष्य नक्षत्र अर्थात कार्त्तिक कृष्ण पक्षातले. यानंतर श्रीकृष्ण व कर्ण यांचे भाषण झाले. तेव्हा श्रीकृष्णाने उल्लेखिलेली अमावास्या अमान्त कार्त्तिक पक्षाची किंवा पौर्णिमान्त मार्गशीर्षाची. येथे महाभारतात प्रामुख्याने अमान्त पद्धतिच आढळून येते हे ध्यानात ठेवावयास हवे. वेदांग कालापासून आजपावेतो फक्त ज्येष्ठा नक्षत्राचा स्वामी इंद्र दिलेला आहे. तसेच वेदकाली तैत्तिरीय संहितेत फक्त चित्रा नक्षत्राचाच स्वामी इंद्र दिला नसून ज्येष्ठा व शततारकाचाही स्वामी इंद्र दिला आहे. शिवाय ज्योतिर्गणिताप्रमाणे अमान्त कार्त्तिक अमावास्येस अथवा पौर्णिमान्त मार्गशीर्ष अमावास्येस चित्रा व शततारका नक्षत्रे असंभाव्य आहेत. तेव्हा श्रीकृष्णाने जिचा निर्देश केला ती अमावास्या कार्त्तिक महिन्याची होती व त्या दिवशी ज्याचा स्वामी इंद्र आहे ते ज्येष्ठा

नक्षत्र होते हे निश्चित. युद्ध या दिवशी सुरू झाले असा निष्कर्ष मात्र एवढ्यावरून काढता येणार नाही.

कालमर्यादेचा दुसरा निश्चित बिन्दू

भीष्म–निर्वाणाचा काल निश्चित ठरविणे शक्य आहे. भीष्माने उत्तरायण लागल्यावर प्राणत्याग करावयाचे ठरविले होते या बद्दल वाद नाही. भीष्म आपल्या पतनानंतर म्हणतात–

धारयिष्यामहं प्राणानुत्तरायणकाङ्क्षया ।

भी. प., ११४–९७ (भांडारकर)

तस्मात् प्राणान् धारयिष्ये मुमूर्षुरुदगायने ।
शिश्येऽहमस्यां शय्यायां यावदावर्तनं रवेः ॥

भी. प. ११४–९८ (भांडारकर)

दिशं वैश्रवणाक्रान्तां यदाऽऽगन्ता दिवाकरः ॥
विमोक्ष्येऽहं तदा प्राणान् सुहृदः सुप्रियानिव ॥

भी. प., ११५–४९ (भांडारकर)

या श्लोकांवरून भीष्म उत्तरायणात वारले हे जरी ठरत असले तरी उत्तरायणात केव्हा वारले हे निश्चित होत नाही.

सूर्य श्रवण[३] नक्षत्राला आला म्हणजे महाभारतकाळी उत्तरायण सुरू होत असे. ह्या उत्तरायणाची तिथी मात्र निश्चित नसे. तेव्हा ही तिथी कोठे शोधावयाची हे कळावयास हवे. भीष्म हे माघ महिन्यात निर्वतले असा स्पष्ट उल्लेख आहे व तो आरंभीच दिला आहे. म्हणून उत्तरायण माघ महिन्यात केव्हा येत होते हे पहावयास हवे. ज्योतिर्गणिताप्रमाणे ते माघ शुक्ल नवमी नंतर सुरू होत नाही. तसेच माघ शुक्ल प्रतिपदेलाही उत्तरायण येऊ शकते. तेव्हा जर भीष्म उत्तरायणात माघ महिन्यात दिवंगत झाले, तर त्यांच्या निर्वाणाची तिथी माघ शुक्ल प्रतिपदेपासून,

---

३. प्रा. र. वि. वैद्य ‘ भारतीय युद्धकालनिर्णय ’, पान ९; ‘ गीतारहस्य,’ लो. टिळक ‘ बहिरंग परीक्षण ’

माघ अमावास्येपर्यंत कोणतीही असू शकते. पण भीष्मांनी ज्या दिवशी माघ महिन्यांत उत्तरायण लागले त्याच दिवशी देह ठेवला या बद्दल निर्विवाद पुरावा उपलब्ध आहे. 'मला शरशय्येवर पडून अठ्ठावन दिवस झाले आहेत व प्रत्येक दिवस शंभर वर्षासारखा भासतो आहे' असे भीष्मांचे उद्गार वर दिलेच आहेत. तेव्हा उत्तरायणाची ते किती आतुरतेने वाट पहात होते ते कळते. अर्थात ते लागल्यावर आणखी काही दिवस प्राण रोखून ठेवण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. तसेच त्यांनी धर्मराजाला उत्तरायण लागल्याबरोबर येण्यास सांगितले होते व त्याप्रमाणे तो आलाही. तेव्हा भीष्मांनी माघात उत्तरायण लागले त्याच दिवशी प्राणत्याग केला हे निश्चित.

आगन्तव्यं च भवता समये मम पार्थिव ।
विनिवृत्ते दिनकरे प्रवृत्ते चोत्तरायणे ।।

अनु. प., १५२–१० (भांडारकर)

स निर्ययौ गजपुराद् याजकैः परिवारितः ।
दृष्ट्वा निवृत्तमादित्यं प्रवृतं चोत्तरायणम् ।।

अनु. प. १५३–६ (भांडारकर)

उत्तरायण हे माघ महिन्यात शुक्लनवमी नंतर येत नाही, तेव्हा भीष्म–निर्वाण हे शुक्ल नवमीनंतर होणे असंभवनीय म्हणून भीष्म–निर्वाणाच्या शुक्ल नवमीनंतरच्या सर्व तिथ्या अग्राह्य होत. आता आपणांस माघ शुक्ल प्रतिपदेपासून शुक्ल नवमीपर्यंतच्या कोणत्या तिथीस भीष्म दिवंगत झाले एवढेच ठरवावयाचे आहे.

' त्रिभागशेषः 'चा व ' भवितुमर्हति 'चा अर्थ

भीष्म निर्वाणाची तिथी ' त्रिभागशेषः ' 'पक्षोऽयं शुक्लो भवितुमर्हति ' या ओळींच्या अर्थावर अवलंबून आहे. ' ती माघ शुक्ल अष्टमी होती ' असे सांगणारा श्लोक प्रक्षिप्त मानण्याचे काहींनी ठरविले आहे. भीष्म–निर्वाणाची प्रचलित तिथी हीच आहे. तरी पण काही विद्वान त्याशी पुराव्याच्या अभावी सहमत नाहीत. आचार्य नीलकंठाने दिलेली

माघ शुक्ल पंचमी हीच काय ती एक तिथी माघ शुक्ल नवमीच्या अगोदरची आहे. बाकीच्या तिथ्या वर सांगितल्याप्रमाणे माघ शुक्ल नवमीच्या नंतरच्या असल्यामुळे असंभाव्य म्हणून चुकीच्या होत. तरी पण यांचा विचार करावयास हरकत नाही. कारण 'त्रिभागशेषः' मुळे प्रश्न सुटत नाही, तर त्या बरोबर 'शुक्लो भवितुम् अर्हति' याचेही स्पष्टीकरण होणे अवश्य आहे. येथे हे स्पष्ट करावयास हवे की, भीष्म-निर्वाणाच्या तिथ्या देताना त्यांना संशयातीत करण्याचा योग्य प्रयत्न झालेला नाही. काही एक पूर्वकल्पना मनात धरून त्याच्या अनुषंगाने स्पष्टीकरणाचा विफल प्रयत्न झाला आहे.

प्रा. ग. वा. कवीश्वर[४] 'भारतीय युद्ध एक दिवसाआड झाले' या कल्पनेच्या सोईसाठी, अनेक तिथ्या व नक्षत्रे यांचा लोप व वृद्धि करून भीष्म-निर्वाणाची तिथी 'माघ-पौर्णिमा' होती असे मानतात.

प्रा. कवीश्वर आपल्या सोईप्रमाणे त्या दिवशी माघ-पौर्णिमा होती असे सांगतात. तसेच 'त्रिभागशेषः' हे मासाचे विशेषण असताना, भीष्म-निर्वाणाच्या वेळेस पौर्णिमेच्या दिवसाचे तीन मुहूर्त शिल्लक होते असा चुकीचा अर्थ करतात. अमरकोशाप्रमाणे भाग म्हणजे एक चतुर्थांश. तरी प्रा. कवीश्वर 'भाग' हा शब्द मुहूर्त या अर्थाने द्रोणपर्वात (गीता प्रेस, १८६-१, १९१-६) इतरत्रही वापरला आहे असे आपल्या समर्थनार्थ सांगतात. एका ठिकाणी 'त्रिभाग' हे रात्रीचे व दुसऱ्या ठिकाणी 'अहनि' म्हणजे संपूर्ण दिवसाचे विशेषण असून त्याचा अर्थ त्या अनुरोधानेच केला पाहिजे. तिथी किंवा नक्षत्र सूर्योदयाशिवाय संपत नाही. तेव्हा ज्या अर्थी तो पौर्णिमेचा निश्चित शुक्ल पक्ष होता व शंभर टक्के उजेड होता, त्याअर्थी 'शुक्ल पक्ष' मानणे उचित होण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तो पूर्णतः शुक्ल पक्ष होता. त्यांनी 'भवितु-मर्हति' चे दिलेले स्पष्टीकरण चूक आहे. तसेच 'त्रिभागशेषः' हे मासाचे किंवा पक्षाचे विशेषण असताना त्यांनी त्या ठिकाणी महा

---

४. महाभारत युद्धाची कालगणनात्मक रहस्ये. पान ३३.

भारतात न सांगितलेल्या शब्दाचे म्हणजे दिवसाचे केले, त्यामुळे तोही अर्थ चुकीचा आहे.

प्रा. र. वि. वैद्य[५] यांनी महाभारतीय कालगणना चांद्रमासीय व अमान्त होती हे कबूल करूनसुद्धा, सौर मास व चांद्र मास यांची सरमिसळ केली आहे. तसेच माघ महिना पौर्णिमान्त मानला आहे. त्यांच्या मते माघ कृष्ण पक्ष चालू होता व शुक्ल पक्ष लागावयाचा होता. सौर मासारंभ अगदी दृष्टिपथात होता. त्यांनी 'त्रिभागशेषः' हे पक्षाचे विशेषण मानून 'तीन अंश' मुक्त होण्याचे बाकी होते असा अर्थ केला आहे. 'माघ अगदी जवळ आला आहे, फक्त तीन रात्री-शिल्लक असून चालू पक्ष शुक्लच असे मानले तरी चालण्यासारखे आहे' अशी भीष्मांनी आपली समजूत करून घेतली असा अर्थ ते करतात, व यावरून भीष्म–निर्वाणाची तिथी माघ कृष्ण त्रयोदशी ठरवितात. प्रा. वैद्यांची विचारसरणी कशी चुकीची आहे हे यावरून कळेल.

आचार्य नीलकंठ 'अष्टपंचाशता'चा अर्थ 'शंभरातून अठ्ठावन कमी' असा करून भीष्माचे निर्वाण पतनानंतर बेचाळीस दिवसांनी झाले असे मानतात. तसेच युद्धारंभ मार्गशीर्ष शुक्ल त्रयोदशीला मानून भीष्म निर्वाणाची तिथी माघ शुक्ल पंचमी असल्याचे सांगतात. त्यांनी 'भवितुम् अर्हति' का म्हटले आहे याचा मात्र खुलासा केलेला नाही. वरील विवेचनावरून आचार्यांचे स्पष्टीकरण का अग्राह्य आहे हे सहज ध्यानात येईल. 'त्रिभागशेषः'चा अर्थ 'ज्याचा एक तृतीयांश भाग व्यतीत होऊन चुकला आहे असा शुक्ल पक्ष' असा करून त्यांनी आणखी चूक केली आहे. भांडारकर संशोधन मंडळाचे डॉ. आर. एन. दांडेकर[६] यांनी 'त्रिभागशेषः'चा अर्थ ज्याचे तीन भाग शेष आहेत असा केला व मग 'अयं शुक्लो भवितुमर्हति'च्या स्पष्टीकरणार्थ तो कृष्ण पक्ष असून भीष्मनिर्वाणाचे दिवशी माघ वद्य चतुर्थी होती असे मानले. ते

---

५. 'भारतीय युद्धकालनिर्णय' पान ३८.

६. 'अनुशासन पर्वाची प्रस्तावना' भांडारकर संशोधन मंडळ.

म्हणतात, वद्य चतुर्थीला शुक्ल एकादशी इतका भरपूर प्रकाश असतो. म्हणून तो दिवस शुक्ल पक्षाचा म्हणणे उचित होईल. धर्मसिंधूत वद्य-चतुर्थीपर्यंत शुक्लपक्ष मानावा असे म्हटल्याचे ऐकतो. केवळ प्रकाशाच्या आधारावर जर हा निर्णय असेल तर सारखाच प्रकाश असल्यामुळे शुक्ल अष्टमी ते वद्य सप्तमीला शुक्ल पक्ष व वद्य अष्टमी ते शुक्ल सप्तमीला वद्य पक्ष का म्हणू नये ? कृष्णपक्ष व शुक्लपक्ष यांची स्पष्ट कल्पना नसल्यामुळे ते या चुकीच्या निर्णयाप्रत पोहोचले.

आपणांस प्रथम ‘ त्रिभागशेष:’चा अर्थ निश्चित करावयास हवा. ‘ त्रिभागशेष:’ म्हणजे ‘ दिवसाचे तीन मुहूर्त शेष ’, ‘ ज्याचा एक तृतीयांश भाग व्यतीत होऊन चुकला आहे तो पक्ष,’ ‘ज्याचा तीन चतुर्थांश भाग शेष आहे तो पक्ष,’ ‘ ज्याचे तीन अंश मुक्त होण्याचे बाकी होते तो पक्ष ’ व ‘ज्या महिन्याचे तीन चतुर्थांश भाग शिल्लक आहेत तो महिना’ असे भिन्न भिन्न अर्थ केलेले आहेत. यांपैकी ‘शुक्ल पक्षाचा एक चतुर्थांश भाग व्यतीत झाला होता ’ व ‘ महिन्याचा एक चतुर्थांश भाग संपला होता ’ या दोनच अर्थांनी भीष्म–निर्वाणाची तिथी माघ शुक्ल नवमीच्या अगोदरची म्हणजे अनुक्रमे माघ शुक्ल चतुर्थी किंवा पंचमी व माघ शुक्ल अष्टमी येते. तेव्हा आपणास आता या दोन तिथ्यांपैकी भीष्म–निर्वाणाची कोणती तिथी बरोबर हे ठरवावयाचे आहे. इतर तिथ्या वर स्पष्ट केल्याप्रमाणे असंभाव्य म्हणून अग्राह्य आहेत. वरील संभाव्य तिथ्यांतून योग्य त्या तिथीची निवड करावयास आपणास ‘ भवितुम् अर्हति ’ या शब्दाच्या अर्थाची मदत घ्यावी लागेल. त्यासाठी अगोदर आपणास शुक्ल पक्ष व कृष्ण पक्ष यांची स्पष्ट कल्पना हवी. वास्तविक भीष्म–निर्वाणाची माघ शुक्ल पंचमी ही तिथी फक्त आचार्य निलकंठाचीच आहे. त्यानी अष्टपंचाशत् म्हणजे बेचाळीस, ही जी कसरत केली आहे ती, त्यानी त्यावरून ठरविलेली भीष्म–निर्वाणाची माघ शुक्ल पंचमी ही तीथी अग्राह्य ठरविण्यास, पुरी आहे. तरी पण आपण तिचा विचार करू.

शुक्ल पक्ष व वद्य पक्ष

शुक्ल पक्ष व वद्य पक्षांतील मुख्य फरक हा की शुक्ल पक्षात सूर्यास्ताबरोबर चंद्र दिसतो तर कृष्ण पक्षात तो काही वेळाने दिसतो.

म्हणजे कृष्ण पक्षात प्रत्येक तिथीची सुरवात अंधाराने होते. शुक्ल पक्षात चंद्र जरी सूर्यास्ताबरोबर दिसतो तरी तो फक्त पौर्णिमेशिवाय कोणत्याही दिवशी पहाटेपर्यंत नसतो. चंद्राचा अस्त पहाटेपूर्वीच होतो. प्रतिपदेला चंद्र सामान्यतः अठ्ठेचाळीस मिनिटे दिसतो व हा दृग्गोचर काल रोज अठ्ठेचाळीस मिनिटाने वाढतो. याउलट कृष्ण पक्षात चंद्रोदय इतक्याच मिनिटानी उशीरा होत जातो अथवा अंधकाराचा काल इतक्याच मिनिटानी सारखा वाढत जातो. तसेच, कृष्ण पक्षात चंद्र नेहमी क्षितिजावर दिसतो व हे अंश पश्चिमेकडून रोज १२ अंशांनी वाढत जातात. कृष्ण पक्षात अमावास्या खेरीज करून बाकीच्या दिवशी चंद्र हा पहाटेपर्यंत असतो. शुक्ल पक्षात चंद्रप्रकाश सारखा वाढतो तर कृष्ण पक्षात तो सारखा कमी होत जातो. यावरून तितक्याच चंद्रप्रकाशाचे तितक्याच वेळ टिकणारे सारखे दिवस दोन्ही पक्षात असतात हे ध्यानात येईल. फरक एवढाच की शुक्ल पक्षातील संध्यासमयाला चंद्रप्रकश, असतो व मग पहाटेकडे अंधार होतो तर कृष्ण पक्षातील संध्यासमयाकडे अंधार वाढत जातो व मग पहाटेपर्यंत चंद्र असतो.

‘ भवितुम् अर्हति ’ केव्हा म्हणतो ?

एखादी गोष्ट उचित आहे हे म्हणण्यासाठी ती प्रथम घडावी लागते. दान केल्यावर मग ते कुपात्री झाले की सत्पात्री झाले हे ठरविता येईल. एखादा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यावरच तो पास होण्यालायक होता किंवा नव्हता असे आपण म्हणतो. त्याला पास होण्यास शेकडा १० टक्के जरी कमी मार्क मिळाले तरी तू जवळजवळ पास झालास म्हणून तुला पास म्हणणे उचित आहे असे म्हणता येणार नाही. पास होण्यास लागणारी न्यूनतम मर्यादा जोपर्यंत तो गाठणार नाही तोपर्यंत तो तिच्या कितीही जवळ आला तरी ‘ तुला पास म्हणणे उचित ठरेल ’ असे म्हणणे अयोग्य होईल. फार झाले तर तुला नापासात काढणे उचित नाही असे आपण म्हणू. पास झाल्यावरही आपण ‘ तो कसा पास झाला ? पास होण्यासारखा नव्हता ’ असे म्हणतो. तेव्हा वद्य पक्षातील तिथी कालांतराने शुक्ल पक्षासारखा प्रकाश देत असली तरी त्यास शुक्ल पक्ष

म्हणणे उचित आहे असे म्हणता येणार नाही. सूर्यास्ताबरोबर चंद्र दिसणे–मग प्रकाश कितीही असो–ही शुक्ल पक्षाची खूण किंवा मर्यादा जोपर्यंत एखाद्या तिथीत नाही तोपर्यंत ती तिथी 'शुक्ल' म्हणण्यास उचित किंवा अनुचित हा प्रश्नच उद्‌भवत नाही. फार झाले तर एवढा प्रकाश असताना या तिथीला वद्य म्हणणे अनुचित आहे असे म्हणता येईल. तेव्हा एखादा पक्ष 'शुक्ल' म्हणण्यास उचित किंवा अनुचित आहे हे ठरविण्यास तो प्रथम शुक्ल पक्ष असावयास पाहिजे म्हणून भीष्म-निर्वाण शुक्ल पक्षातच झाले हे निश्चित.

आता तो जर शुक्ल पक्ष निश्चित होता तर 'भवितुम् अर्हति'चा प्रश्नच कसा उद्‌भवतो? ह्याचा विचार करावयास हवा. ज्यांनी भीष्म-निर्वाण माघ वद्यात ठरविले आहे त्यांच्या तिथ्या चतुर्थीच्या पुढे आहेत. चतुर्थीला चंद्र सूर्यास्तानंतर साधारणपणे साडे तीन तासांनी क्षितिजा-पासून वर येतो. म्हणजे जवळ जवळ रात्री ९॥ पर्यंत अंधार असतो. मग चंद्र जसजसा वर येतो तसतसा प्रकाश वाढतो. 'भवितुम् अर्हति'चा प्रश्नच उद्भवत नाही. या अंधारासकट चतुर्थीला शुक्ल पक्षासारखी कोणी म्हणणार नाही. उलट शुक्ल प्रतिपदेला चंद्र पश्चिमेला साधारण १२ अंशावर सूर्यास्ताला दिसतो व अधिकांत अधिक ४८ मिनिटात मावळतो व संपूर्ण अंधार होतो. सामान्यत: शुक्ल प्रतिपदेचा चंद्र दिसत नाही. येथे साहजिकच 'हा कसला शुक्ल पक्ष' असे उद्‌गार निघू शकतात. द्वितीयेला चंद्र अवघा दीड तास व प्रकाश केवळ सात टक्के असतो. वरील विवेचनावरून शुक्ल पक्षाच्या प्रथम आठवड्यात चंद्र प्रकाश फार वेळ नसल्याने व तोही बराच मंद असल्याने त्याला शुक्ल पक्ष म्हणावयाचे का? असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. शुक्ल चतुर्थीला व पंचमीला चंद्रप्रकाश अवघा क्रमश: एकवीस व तीस टक्के असतो. साधारण प्रकाश पन्नास टक्के असल्याशिवाय तो पुरेसा आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून या तिथ्यांनाही 'हा कसला शुक्ल पक्ष' असे म्हणता येईल. उलट शुक्ल अष्टमीला प्रकाश एक्कावन टक्के असून चंद्र अगदी माथ्यावर उगवतो. तेव्हा आता शुक्ल पक्ष तर आहेच पण ते नावही उचित किंवा सार्थ आहे असे म्हणता येते. 'भवितुमर्हति'चे

हे स्पष्टीकरण इतर कोणत्याही स्पष्टीकरणापेक्षा अधिक ग्राह्य आहे. तसेच भीष्म–निर्वाण माघ शुक्ल चतुर्थी किंवा पंचमीला जरी संभाव्य होते तरी ते 'भवितुमर्हति'च्या अर्थामुळे आता अग्राह्य सिद्ध झाले आहे. तेव्हा जिला 'त्रिभागशेष:' व 'भवितुम् अर्हति' ह्यांचे स्पष्टीकरण लागू पडते व जी माघ शुक्ल नवमीच्या अगोदर असल्यामुळे उत्तरायण-प्रारंभास संभाव्य आहे ती माघ शुक्ल अष्टमीच शिल्लक राहते. यावरून भीष्म निर्वाण माघ शुक्ल अष्टमीस झाले हे निर्विवाद. अर्थात्–

शुक्लपक्षस्य अष्टम्यां माघ मासस्य पार्थिव ।

ही ओळ ग्राह्य मानणे भाग आहे.

भीष्म–निर्वाणाची तिथी निश्चित झाल्यामुळे आता आपणांस युद्धारंभाचा दिवस काढता येतो. तथापि तत्पूर्वी भारतीय युद्धारंभाच्या ज्या तिथ्या विद्वानांनी सांगितल्या आहेत त्यांचा विचार करावयास हवा.

भारतीय युद्धारंभाच्या निरनिराळ्या तिथ्या

भारतीय युद्धारंभाच्या तिथिसंबंधाने बरीच मतभिन्नता आहे. नीलकंठाचार्यांच्या मते युद्धारंभी मृग नक्षत्र असून तो मार्गशीर्ष शुक्ल त्रयोदशीचा दिवस होता. महाभारताचार्य चिंतामणराव वैद्य[७] यांनी सुद्धा हीच तिथी ग्राह्य मानली आहे. पण त्या दिवशी चतुर्दशी किंवा पौर्णिमाही असू शकते असे ते म्हणतात. भांडारकर संशोधन मंडळाच्या महाभारताचे एक संपादक डॉ. आर. एन. दाडेकर[८], तसेंच श्री के. व्ही. अभ्यंकर[८] यांनी ही युद्धारंभाची तिथी मार्गशीर्ष शुक्ल त्रयोदशी मानली असून त्या तिथीला रोहिणी नक्षत्र होते असे सांगितले आहे. प्रा. र. वि. वैद्य हे युद्धारंभी पुनर्वसु किंवा पुष्य नक्षत्र असल्याचे सांगतात, तर पंडित देवकीनंदन खेडवाल हे त्या दिवशी भरणी नक्षत्र होते, असे म्हणतात.

---

७. महाभारताचा उपसंहार, पृ १२७–१२८.

8. *Aunals of the Bhandarkar Oriental Research Institute, Poona*, Vol XXV. pp. 116–136.

मघा विषयगः सोमस्तद् दिनं प्रत्यपद्यत । असा उल्लेखही महाभारतात भीष्म–पर्वात आढळतो.

प्रचलित समजाप्रमाणे गीताजयंती मार्गशीर्ष शुक्ल एकादशीला मानतात व युद्धारंभी गीता सांगितली असे मानले तर युद्धाचा प्रथम दिवस मार्गशीर्ष एकादशीला येतो.

डॉ. के. एल. दफ्तरी,[९] महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे,[१०] श्री. रा. ल. गोखले[११] आदींच्या मते भारतीय युद्ध कार्त्तिक अमावास्येला ज्येष्ठा नक्षत्रावर सुरू झाले. प्रा. के श्रीनिवास राघवन्[१२] या अमावास्येस युद्धतयारीचा दिवस मानतात, तर प्रा. ग. वा. कवीश्वरांनी कार्त्तिक अमावास्येला असंभवनीय असलेले चित्रा नक्षत्र होते असे प्रतिपादले आहे.

भारतीय युद्धारंभ ठरविण्याच्या प्रमुख पद्धती

महाभारतात भीष्म–निर्वाण युद्धारंभानंतर ६८ दिवसानंतर झाले याचा स्पष्ट उल्लेख आहे व तो श्लोक पूर्वीच दिला आहे. तसेच हे निर्वाण केव्हा झाले हेही दिलेले आहे, पण ते स्पष्ट शब्दांत न दिल्याने विद्वानांना आपापल्या तर्काप्रमाणे ही तिथी ठरविण्यास वाव मिळाला. एकदा ही तिथी निश्चित केल्यावर तेथून मागे ६८ दिवस मोजले की युद्धारंभाची संभाव्य तिथी येते. विद्वानांत भीष्म–निर्वाण तिथीबद्दल मतैक्य नसल्याने साहजिकच युद्धारंभाची तिथी व नक्षत्र ही निरनिराळ्यांनी निरनिराळे दिली आहेत.

भारतीय युद्धारंभ ठरविण्याचा दुसरा पर्याय म्हणजे श्रीकृष्ण–कर्ण यांच्या भाषणाचा श्लोक होय.

सप्तमात् चापि दिवसात् अमावास्या भविष्यति ।
संग्रामो युज्यतां तस्यां तामाहुः शक्रदेवताम् ।। उ. प.

---

9. *Astronomical method and its applications* etc. 1942, p. 125.
10. *History of Dharmaśāśıra*, Vol III, pp. 907–915.
12. *the Date of the Mahabharata Wae.*

या श्लोकाप्रमाणे युद्ध अमावास्येला सुरू झाले व त्या दिवशी ज्याचा स्वामी इंद्र आहे ते नक्षत्र होते. त्याच्या पूर्वी श्रीकृष्ण कार्त्तिक शुक्ल पक्षांत शिष्टाईस निघाले असे म्हटले असल्यामुळे ही अमावास्या कार्त्तिकाची मानली आहे. वेदकाली चित्रा, शततारका व ज्येष्ठा यांचा स्वामी इंद्र दिला आहे. पण कार्त्तिक अमावास्या चित्रा व शततारका नक्षत्राला असंभाव्य असल्याने ओघानेच त्या तिथीला ज्येष्ठा नक्षत्र होते असे मानले आहे.

इतर विद्वानांनी बलरामाच्या तोंडचा—

चत्वारिंशद् अहान्यद्य द्वे च मे निःसृतस्य वै ।
पुष्येण संप्रयातोस्मि श्रवणे पुनरागतः ।।

श. प. ३३–५ (भांडारकर)

हा श्लोक आधारभूत मानून 'श्रवण' नक्षत्राला युद्ध संपले असे ठरविले व मग अठरा दिवस मागे मोजून युद्धारंभाचा दिवस निश्चित केला आहे. भारतीय युद्धाचा प्रथम दिवस निश्चित करताना या सर्व पर्यायांचा नीट विचार करावयास पाहिजे.

भारतीय युद्धाची निश्चित तिथी कार्त्तिक अमावास्या व नक्षत्र ज्येष्ठा

भीष्म–निर्वाण माघ शुक्ल अष्टमीस झाल्याचे निश्चित केले आहे. तसेच युद्धारंभानंतर अडुसष्ट दिवसांनी भीष्मांनी देहत्याग केला याबद्दलही वाद नाही. तेव्हा माघ शुक्ल अष्टमीच्या मागे अडुसष्ट दिवस मोजले तर युद्धारंभाची तिथी येईल. पण चंद्राच्या गतिमुळे दोन महिन्यात एका तिथीचा फरक पडावयास हवा. तेव्हा अडुसष्ट दिवस मागे मोजावयाचे झाल्यास एका तिथीचा लोप करावा लागेल. असे केल्यास युद्धारंभाची तिथी कार्त्तिक अमावास्या येते. भीष्म–निर्वाणावरून युद्धारंभ ठरविण्याचा पर्याय व श्रीकृष्ण–कर्ण संभाषणाच्या श्लोकावरून युद्धारंभ ठरविण्याचा पर्याय ह्या दोहींवरून एकच निष्कर्ष निघतो. म्हणून भारतीय युद्ध कार्त्तिक अमावास्येस ज्येष्ठा नक्षत्रावर सुरू झाले हे निश्चित. भीष्म–

निर्वाणाची तिथी ठरविताना आपण नक्षत्र ठरविले नव्हते. आता ज्येष्ठाच्या पुढे अडुसष्ट दिवस मोजल्यास ते ठरविता येते. ओघानेच ते रोहिणी नक्षत्र होते. यावरून प्रक्षिप्त मानलेल्या श्लोकाची दुसरी ओळ

प्राजापत्ये च नक्षत्रे मध्यं प्राप्ते दिवाकरे ।

सुद्धा प्रक्षिप्त नसून खरी आहे असे म्हणावे लागते.

गीताजयंती माघ शुक्ल एकादशीला मानतात. युद्धारंभी गीता सांगितली गेली असा समज आहे. तेव्हा माघ शुक्ल एकादशीला युद्ध सुरू झाले असेही एक मत व्यक्त केले जाते. परंतु गीताजयंती माघ शुक्ल एकादशीला सांगितली असा उल्लेख महाभारतात कोठेच नसल्याने हे मत आधाररहित म्हणून अग्राह्य आहे. युद्ध सतत अठरा दिवस चालले या हिशोबाने युद्ध-समाप्तीची तिथी मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी येते, पण नक्षत्राचा निर्णय करता येत नाही. बलरामाच्या श्लोकाप्रमाणे हे नक्षत्र श्रवण मानल्यास मार्गशीर्ष अमावास्या असंभाव्य अशा शततारका नक्षत्रास येते. शिवाय, बाकीचेही ज्योतिर्गणित चूक येते. तेव्हा युद्धारंभ माघ शुक्ल एकादशीला झाला हे मानता येत नाही.

आणखी एक महत्त्वाचा पर्याय, ज्यावरून युद्धारंभ ठरविण्यात आला आहे तो–म्हणजे शल्य-पर्वातील बलरामाच्या तोंडचा श्लोक होय. येथे ध्यानात ठेवावयास हवे की बलराम हा उद्योगपर्वात यात्रेस गेला; पण तेथे मात्र नक्षत्र वगैरे काही सांगितलेले नाही. पण शल्यपर्वांत मात्र सर्व नक्षत्रे एकामागून त्याला एक अचूक आठवतात हे जरा चमत्कारिकच वाटते. केव्हाही घटनेच्या वेळचे श्लोक अधिक ग्राह्य. हा श्लोक इतर श्लोकांशीही विसंगत आहे, त्यामुळे सुद्धा तो अग्राह्य आहे. कसा ते आपण प्रथम पाहू.

पुष्य नक्षत्राचा पुनःपुन्हा उल्लेख

पुष्य नक्षत्रासंबंधाचे बरेच श्लोक महाभारतात युद्धकालात आहेत. ह्या पुष्य नक्षत्रांचा परस्परसंबंध काय हे ठरविणे कठीण आहे. पुष्य नक्षत्र प्रवासाला शुभ मानल्यामुळे प्रत्यक्षात या नक्षत्राला बाहेर निघाले नसतानाही कवीने कविकल्पना म्हणून तर त्याचा उल्लेख केलेला नाही ?

द्रुपदाचा पुरोहित पांडवांकडे दूत म्हणून पुष्य नक्षत्रावर गेल्याचे सांगितले आहे.

स भवान् पुष्ययोगेन मुहूर्तेन जयेन च ।

दुर्योधन राजा श्रीकृष्ण–शिष्टाईच्या वेळेस आपल्या मांडलिकराजांना पुष्य नक्षत्रावर प्रयाण करण्यास सांगतो.

प्रयाध्वं वै कुरुक्षेत्रे पुष्योद्येति पुनः पुनः ।

उ. प. १४८–३ (भांडारकर)

'आज पुष्य नक्षत्र आहे तेव्हा कुरुक्षेत्राकडे प्रयाण करा ?

अर्थात हे पुष्य नक्षत्र कार्त्तिक वद्यातले, कारण श्रीकृष्ण उपप्लव्याहून कार्त्तिकात रेवती नक्षत्रावर म्हणजे शुक्ल पक्षात हस्तिनापुराकडे शिष्टाई साठी निघाले होते. ही तिथी वद्य पंचमी, शष्ठी किंवा सप्तमी असू शकते.

याच उद्योगपर्वात शिष्टाईनंतर काही दिवसांनी बलराम व श्रीकृष्ण यांची पांडवांकडे भेट होऊन त्यांचा मतभेद झाल्यामुळे बलराम तीर्थ यात्रेस निघून गेला असे सांगितले आहे. येथे नक्षत्राचा मुळीच उल्लेख नाही. हा श्लोक घटनेच्या वेळचा असल्यामुळे विश्वसनीय होय.

एवमुक्त्वा महाबाहुरनुज्ञातश्च पांडवैः ।
तीर्थयात्रां ययौ रामो निवार्य मधुसूदनम् ॥

जेव्हा बलराम तीर्थयात्रेहून परत येतो तेव्हा मागील घटनांचे पुनरावलोकन होते. आता मात्र पूर्वी न आठवलेली नक्षत्रे आठवू लागतात, हे संशयास्पद आहे. बलराम म्हणतो,

पुष्येण संप्रयातोस्मि श्रवणे पुनरागतः ।

हे नक्षत्र जर खरे असेल तर हस्तिनापुरातील पुष्यनक्षत्रानंतरचे पुष्य नक्षत्र असले पाहिजे. याच शल्यपर्वात श्रीकृष्णाला व कवीलाही स्मृती होते:—

निर्गच्छध्वं पांडवेयाः पुष्येण सहिता मया ।

'माझ्या बरोबर पुष्य नक्षत्रावर कुरुक्षेत्रावर निघा' असे श्रीकृष्ण पांडवांस म्हणतात. वास्तविक पांडव व श्रीकृष्ण आधीच कुरुक्षेत्रावर पोहचले

होते व मग बलरामाची भेट झाली असे उद्योगपर्वात सांगितले आहे. मग हे पुष्य नक्षत्र कोणते व हे पुनःप्रयाण कोणते ? क्षणभर श्रीकृष्ण-बलराम मतभेद व नंतर त्यांचे प्रयाण याचे पुष्य नक्षत्र व श्रीकृष्ण-पांडव कुरुक्षेत्राकडे निघाले ते पुष्य नक्षत्र एकच मानू, म्हणजे या क्रिया एकाच वेळी घडल्या असे गृहीत धरू. असे केल्याने या दोन पुष्य नक्षत्रांचा काही तरी मेळ घालता येईल.

दोन पुष्य नक्षत्रांत सत्तावीस दिवसाचे अंतर असते. तेव्हा हस्तिनापुरातील कार्त्तिक वद्यातील पुष्य नक्षत्राच्या सत्तावीस दिवसांनी बलराम तीर्थयात्रेस गेला. त्यानंतर बेचाळीस दिवसांनी युद्ध संपले व पुढे पन्नास दिवसांनी भीष्म-निर्वाण झाले. तेव्हा हस्तिनापुरातील पुष्य नक्षत्रानंतर एकशे एकोणीस दिवसांनी म्हणजे चार महिन्यांनी भीष्य निजधामास गेले. अर्थात भीष्म-निर्वाण आता असंभवनीय अशा फाल्गुन वद्यात येते. तेव्हा बलरामाच्या तोंडचा श्लोक अग्राह्य आहे.

याच अध्यायांतील.

रोहिणे वै गते शूर पुष्येण मधुसूदन ।

बलराम गेल्यावर श्रीकृष्ण पांडवांकडे पुष्य नक्षत्रावर जांण्यास निघाला. ह्या श्लोकाने तर कहरच केला आहे. श्रीकृष्ण पांडवांकडे कधीच पोचले होते.

वरील विवेचनावरून बलरामाच्या तोंडचा श्लोक घटनांशी कसा विसंगत आहे हे स्पष्ट होईल. तरी पण क्षणभर तो बरोबर मानून त्या पासून काय निर्णय प्राप्त होतात ते पाहू.

बलरामाच्या श्लोकावरून युद्धारंभ ठरविण्याचा पर्याय

शल्यपर्वात बलराम म्हणतो,

चत्वारिंशद् अहान्यद्य द्वे च मे निःसृतस्य वै ।
पुष्येण संप्रयातोऽस्मि श्रवणे पुनरागतः ।।

या श्लोकाप्रमाणे भीष्म-दुर्योधन गदायुद्ध श्रवण नक्षत्राला झाले. प्रश्न हा आहे की, त्या दिवशी बलरामाला प्रवासाला जाऊन बेचाळीस

दिवस झाले होते असे मानले तर 'श्रवणा'चा दिवस त्रेचाळीसावा होतो. आज मला बेचाळीस दिवस होतील असा अर्थ केला तर मात्र बेचाळीस दिवस होतात. पुष्य ते श्रवण एकूण बेचाळीस नक्षत्रे आहेत. त्रेचाळीस दिवस मानले तर या कालात एका नक्षत्राची वृद्धी झाली असे मानणे भाग आहे. नाही तर नक्षत्राची वृद्धी अथवा लोप या कालांत झाला नाही हे उघड आहे.

एवढया श्लोकावरून तिथी ठरविता येत नाही, हे उघड आहे. दुर्योधन अमावास्येला गेला हा श्लोक आधाराला घ्यावा लागतो.

रोहिणीं पीडयत्येवमुभौ च शशिभास्करौ ।

सूर्यचंद्र एकाच गृहांत होते म्हणजे ज्येष्ठा नक्षत्र होते. महाभारत-काली ज्येष्ठा नक्षत्राला रोहिणी म्हणत. तसे पाहिले तर या श्लोकात 'श्रवण' नक्षत्र नाही; ज्येष्ठा आहे. पण आपण तात्पुरते श्रवणाला दुर्योधन मारला गेला तेव्हा अमावास्या होती असे मानू. आता अठरा दिवस मागे मोजले तर 'मृग' नक्षत्र व शुक्ल त्रयोदशी येते. डॉ. दांडेकरांनी या तिथीला 'रोहिणी' नक्षत्र मानले आहे. त्याअन्वये अठराव्या दिवशी उत्तराषाढा नक्षत्र येते. एका नक्षत्राचा लोप केल्यास श्रवण येईल. पण वर नक्षत्र–वृद्धी कदाचित मानता येईल, पण लोप असं-भाव्य आहे हे स्पष्ट केले आहे. तेव्हा हे नक्षत्र चुकीचे आहे, किंवा बलरामाचा श्लोक ते अग्राह्य मानतात असे म्हणावे लागेल. भीष्म–निर्वाण माघातले. तेव्हा ही त्रयोदशी मार्गशीर्ष शुक्लाची होय व श्रवण नक्षत्र ह्याच महिन्याच्या अमावास्येचे. पण मार्गशीर्ष अमावास्या श्रवणाला असंभाव्य म्हणून अग्राह्य. डां. दांडेकरांचे उत्तराषाढाही येऊ शकत नाही. पण श्लोकात दिलेले ज्येष्ठा येऊ शकते. तेव्हा बलरामाचा श्लोक ग्राह्य मानून युद्धारंभाच्या ठरविलेल्या तिथ्या व नक्षत्रे ज्योतिर्गणिताच्या विरुद्ध जात असल्याने त्याज्य होत. म्हणूनच हा श्लोक अग्राह्य आहे. इतर श्लोकांशी व घटनांशी विसंगत म्हणून व ज्योतिर्गणिताच्या विरुद्ध निर्णय देतो म्हणून, या दोन्ही कारणांनी हा श्लोक अग्राह्य मानणे भाग आहे.

प्रथम काही दिवसांची युद्ध–समाप्तीची वर्णने वद्य पक्षालाच पूरक असल्यामुळेही मार्गशीर्ष शुक्ल पक्षांतील एकादशी किंवा त्रयोदशी या तिथ्या असंभाव्य होत.

सरतेशेवटी, महाभारतातील श्लोकांना तसेच ज्योतिर्गणिताला पूरक अशीच एक तिथी शिल्लक राहते, ती म्हणजे कार्त्तिक अमावास्या, जिचे नक्षत्र ज्येष्ठा होते. तसेच या नक्षत्राचा स्वामी इंद्र आहे. तेव्हा भारतीय युद्ध कार्त्तिक अमावास्येला सुरू झाले असे मानण्याशिवाय गत्यंतर नाही. ही तिथी व भीष्म–निर्वाणाची तिथी एकमेकांना पूरक होत असल्याने तर या निर्णयास बळकटी येते.

बलराम अनुराधा नक्षत्राला तीर्थयात्रेस गेला

शल्यपर्वाच्या चौतीसाव्या अध्यायात बलराम अनुराधा नक्षत्रावर तीर्थयात्रेस निघाल्याचे स्पष्ट म्हटले आहे.

मैत्रनक्षत्रयोगे स्म सहिताः सर्वयादवैः ।

गीता प्रेस, तसेच प्रा. न. र. फाटक–संपादित महाभारताच्या भाषांतरात 'मैत्र नक्षत्र योगे स्म'चा अर्थ बलराम अनुराधा नक्षत्रावर चंद्र असताना निघाला असाच केला आहे. डॉ. दांडेकर मात्र बलरामाचा जो श्लोक संपूर्णपणे त्याज्य असल्याचे सिद्ध झाले, त्यातील पुष्य नक्षत्रास चिकटून आहेत. त्यांच्या मते येथे सूर्य अनुराधा नक्षत्रावर होता असा अर्थ अभिप्रेत आहे. एकदा बलरामाच्या श्लोकाला अग्राह्य ठरवल्या-वर त्यांच्या म्हणण्यास अर्थच रहात नाही. शिवाय महाभारतातील असले उल्लेख चंद्रालाच उद्देशून आहेत. पूर्वीच्या श्लोकांत ' पुष्य–योगेन ' असा उल्लेख आहे तर भीष्म–निर्वाणाच्या वेळेस ' प्राजापत्ये व नक्षत्रे ' असे म्हटले असले तरी दोन्ही ठिकाणी फक्त चंद्र त्या नक्षत्राला होता एवढाच अर्थ केला आहे. सूर्य कार्त्तिक वद्यात अनुराधा नक्षत्रास यावयास त्याच दिवशी चंद्र पुष्य नक्षत्राला कार्त्तिक वद्य षष्ठीस असावयास पाहिजे. डॉ. दांडेकरांनी युद्धारंभ मार्गशीर्ष शुक्ल त्रयोदशीला मानला असून नक्षत्र रोहिणी दिले आहे. तसेच बलरामाचा श्लोक ग्राह्य मान-ल्यामुळे नक्षत्राचा लोप असंभाव्य आहे. महाभारतात कार्त्तिक वद्य पक्ष

तेरा दिवसांचा आहे. तेव्हा पुष्य नक्षत्राला अधिकात अधिक चतुर्थी येते. तेव्हा त्यांचे, 'नक्षत्रयोगे' म्हणजे सूर्य अनुराधा नक्षत्रावर होता हे म्हणणे मान्य करता येत नाही. अर्थात् बलराम अनुराधा नक्षत्रावर म्हणजे युद्धरंभाच्या एक दिवस अगोदर तीर्थयात्रेस निघून गेला हेच म्हणणे सयुक्तिक आहे. युद्धाच्या अगोदर अनेक दिवस निघून जाण्याचे कारण काय? तसेच सामोपचराचे बोलणे खुंटल्यावर शिष्टाईनंतर अनेक दिवस वाट पाहून मग युद्ध सुरू करण्याचे कोणतेच प्रयोजन नाही. युद्धे ही वार्ता संपल्याबरोबर तडकाफडकी सुरू होतात. तसे पाहिले तर दोन्ही पक्षांची सैन्ये शिष्टाईच्या वेळेस जमली होती असे दिसते. इतक्या मोठ्या सैन्याचा खर्च व व्यवस्था त्यांना शिष्टाईनंतर कित्येक दिवस तिष्ठत ठेवून करणारे कौरव–पांडव अव्यावहारिक म्हणावयास हवेत. पांडवांकडे तर आर्थिक विवंचनाच होती.

भारतीय युद्ध–घटनाचे काल

भारतीय युद्ध कार्त्तिक अमावास्येस ज्येष्ठा नक्षत्रावर सुरू झाले व भीष्म निर्वाण माघ शुक्ल अष्टमीला रोहिणी नक्षत्रावर घडले हे दोन काल आपण निश्चित केले आहेत. आता इतर घटनांचे काल ठरविणे योग्य होईल.

दुर्योधन गदा–युद्धाचा काल

शल्य पर्वाच्या गदा–युद्धपर्वात ज्या दिवशीं दुर्योधन ह्रदात लपला होता त्याच दिवशी ह्रदातून बाहेर पडून युद्ध कर असे कृपादींनी त्यांस सांगितले, त्यावर आजची रात्र विश्रांती घेतल्यावरच मी लढेन असे तो म्हणाला, पण त्याच वेळेस पांडवांनी त्यास वेढले व ह्रदाबाहेर येऊन लढण्यास भाग पाडले. यावरून गदा–युद्ध शल्यवधाच्या दिवशीच रात्री झाले हे निर्विवाद. दुर्योधनाला रात्रीची विश्रांती मिळाली नाही असा स्पष्ट उल्लेख असताना तो दुसऱ्या दिवशी सकाळी लढला असे म्हणणे चुकीचे आहे. शिवाय कोंडींत पकडलेल्या दुर्योधनाला रात्रभर विश्रांति मिळू देण्याइतके पांडव अव्यवहारी नव्हते. भारतीय युद्ध सतत चालले या भूमिकेवरून ह्या दिवशी मार्गशीर्ष वद्य द्वितीया किंवा तृतीया

होती. या वेळेस चंद्राचा प्रकाश शुक्ल द्वादशी किंवा त्रयोदशीइतका म्हणजे ब्याऐंशी ते ब्याण्णव टक्के अथवा भरपूर असल्यामुळे रात्री गदायुद्ध संभवनीय आहे. युद्ध पहात असताना 'बलराम चंद्राने वेढलेल्या नक्षत्रासारखा दिसत होता' हे वर्णन रात्रीच्या समयास अनुरूप आहे. तसेच अश्वत्थाम्याला सेनापत्यभिषेक झाला तो दिवसा झाला असता तर पांडवांस कळते व ते तयारीने राहते व पुढील अनर्थ टळता. सेनापत्यभिषेकानंतर दुर्योधन रात्री तेथेच पडून राहिला असे सांगितले आहे. ही गोष्ट गदायुद्ध रात्री झाले ह्या गोष्टीचे समर्थन करते. पुढे संहार केल्यावर ही बातमी ऐकण्याच्या वेळेस तो शुद्धीत होता. सकाळी मांडी फोडून सतत रक्तस्राव होत असताना इतका वेळ दुर्योधन जिवंत राहणे शक्य नाही. तेव्हा गदायुद्ध हे शल्यवधाच्याच दिवशी रात्री मार्गशीर्ष त्रयोदशीस झाले असेच ठरते.

त्या दिवशी 'श्रवण नक्षत्र' असून मार्गदशीर्ष अमावास्या किंवा चतुर्दशी होती हे म्हणणे ज्योतिर्गणिताशी विसंगत आहे. तसेच पौष शुक्ल चतुर्थीच्या पुढे श्रवण नक्षत्र येत नसल्याने पौष शुक्ल पंचमी ही अग्राह्य आहे. युद्ध रात्री झाले असल्यामुळे या तिथ्या त्यासाठी पूरक नाहीत, कारण या तिथ्यांना चंद्रप्रकाशाचा अभाव आहे.

राजन्नुत्तिष्ठ युद्धचस्व सहास्माभिर्युधिष्ठिरम्
विश्रम्यैकां निशामद्य भवद्भिः सहितो रणे ।

स बभौ राजमध्यस्थो नीलवासाः सितप्रभ : ।
दिवीव नक्षत्रगणैः परिकीर्णो निशाकरः ॥

दुर्योधनोऽपि राजेन्द्र शोणितेन परिप्लुतः ।
तां निशां प्रतिपेदेऽथ सर्वभूतभयावहाम् ॥
प्रतिलभ्य पुनश्चेत इदं वचनमब्रवीत् ॥ १६ ॥

गीताजयंती मार्गशीर्ष शुक्ल एकादशीला

युद्धारंभ कार्तिक अमावास्येस झाला. तेथून दहाव्या दिवशी भीष्मपतन झाले. संभाव्य अशा एका तिथीचा लोप मानल्यास ह्या

दिवशी मार्गशीर्ष शुक्ल दशमी येते. आता मार्गशीर्ष शुक्ल एकादशीला गीता सांगण्याचे प्रयोजन निर्माण होते.

गीता ही युद्धारंभी सांगितली हा प्रश्न वादग्रस्त असून पुरावे बहुतांशी विरोधात आहेत. महाभारताच्या कांही हस्तलिखितात भीष्मपर्वात 'गीता' नाही. भीष्म व द्रोण हे जरी वृद्ध असले व पितामह व गुरू असले तरी त्यांस प्रथम मारीन असे युद्धापूर्वी अर्जुनाने उलूकास स्पष्ट सांगितले आहे. तेव्हा अर्जुनास विषाद होण्याची परिस्थिती नव्हती. त्याने उलट धर्मराजास धीर दिला, त्याला दुर्गेने यशस्वी होशील असा युद्धाच्या थोडचा वेळापूर्वी वर दिला होता. तसेच अर्जुन जात्याच चंद्रवंशी असल्यामुळे त्याची मनोवृत्ती बदला घेण्याची होती. गीतेचा प्रथम अध्याय कृत्रिम आहे. युद्धारंभादिवशी भीष्म व कर्ण यांचे ठरल्याप्रमाणे, कर्ण युद्धात सेनानायक म्हणून उपस्थित राहणे अशक्य होते. तेव्हा गीता युद्धारंभी सांगण्याचे कोणतेच प्रयोजन नव्हते.

उलट युद्धाच्या आठव्या दिवसापासून त्याच्या मनात द्वंद्व सुरू झाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. 'मला राज्य नको, मी स्वजनांना मारणार नाही.' वगैरे तो आता म्हणतो. गीता जर त्याला यापूर्वी सांगितली गेली असती तर पुनः तेच प्रश्न त्याच्या मनात उपस्थित न होते. आता पितामहाला अधर्माने मारल्यावर शोकामुळे, तसेच स्वतःचे अंतःकरण खात असल्याने, युद्धापासून निवृत्त होणे संभवनीय होते. या वेळेस गीतेचा उपदेश अवश्य होता. तेव्हा गीता मार्गशीर्ष एकादशीला म्हणजे प्रचलित मान्य तिथीलाच सांगितली जाणेच संभवनीय आहे.

जयद्रथवध मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला

जयद्रथवधानंतर सूर्यास्ताबरोबर युद्ध थांबले नाही. ते मशाली न लावतासुद्धा रात्री बऱ्याच वेळ चालले असे वर्णन आहे. या काळात शिबि, वाल्हिक आदि रथी-महारथी मारले गेले. अजून मशाली पेटविल्या नव्हत्या; या वरून हे युद्ध भरपूर चंद्रप्रकाशात चालले होते असाच निष्कर्ष निघतो. मग आकाश ढगाळले असावे. मार्गशीर्षात आकाश अनेकदा ढगाळते. तेव्हा मशाली पेटविल्या. सैन्य थकल्यामुळे त्याने मग

विश्रांती घेतली. पुढे ढग निघून गेल्यावर स्वच्छ प्रकाश पडला व युद्ध चालू झाले. युद्ध चतुर्दशीला पौर्णिमेइतका प्रकाश असतो. तेव्हा एवढ्या प्रकाशात युद्ध होणे संभवनीय आहे. शिवाय चंद्रप्रकाश पहाटे पर्यंत राहतो.

याचे उलट या दिवशी मार्गशीर्ष वद्य एकादशी मानली तर चंद्र नसल्याने रात्री युद्ध असंभवनीय आहे. पहाटेकडे उगवणारा चंद्र अवघा अठ्ठावीस टक्के प्रकाश देतो, ज्यात युद्ध संभवनीय नाही. तसेच वद्य द्वादशी मानली तर हा प्रकाश आणखी कमी म्हणजे केवळ एकवीस टक्के असतो. तेव्हा कार्त्तिक अमावास्येपासून युद्ध सतत चालले या समजाप्रमाणे जयद्रथवधाचे रात्री मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशीच होती हेच खरे.

युधिष्ठिराचे हस्तिनापुरातील पन्नास दिवस

यधिष्ठिर हा युद्ध संपल्याबरोबर हस्तिनापुरात गेला हे शल्यपर्वातील अध्याय १५३–५ व १५३–२७ वरून निश्चित होते असे भांडारकर संशोधन मंडळाने संपादित केलेल्या महाभारतात सांगितले आहे तसेच अनुशासन–पर्वात युद्धात पडलेल्या वीरांचे आशौच पाळीत नाही असे सांगितले आहे. तेव्हा हस्तिनापुरात राहून पन्नासावे दिवशी युधिष्ठिर भीष्म–निर्वाणासाठी आला हे उघड आहे. गादीवर राजाला ताबडतोब बसवतात, मग समारंभ केव्हाही होवो. गादी केव्हाच खाली रहात नाही. म्हणून धर्मराजाला सुतक नव्हते.

उषित्वा शर्वरीः श्रीमान् पंचाशन्नगरोत्तमे ।

इतर घटनांच्या कालाचा समन्वय

युद्धारंभाची तिथी निश्चित झाल्याने, ह्या अनुरोधाने श्रीकृष्ण रेवती नक्षत्रावर कार्त्तिक शुक्ल एकादशीस किंवा द्वितीयेची वृद्धी जी संभाव्य आहे ती मानल्यास द्वादशीस उपप्लव्याहून निघाला. आता कार्त्तिक पौर्णिमा संभाव्य अशा रोहिणी नक्षत्रास येते. पुढील पक्ष तेरा दिवसांचा असल्याने एका तिथीचा लोप केल्यास पुष्य नक्षत्र पंचमीस येते. या दिवशी श्रीकृष्ण–कर्ण भाषण होणे शक्य नव्हते. मध्यंतरीच्या घटनांस एक दिवस तरी लागला असावा. तेव्हा हे भाषण मघा नक्षत्रास झाले.

तेथून एक तिथी व एक नक्षत्राचा लोप केल्यास कार्त्तिक अमावास्या ज्येष्ठा नक्षत्रास मिळते. ज्योतिर्गणिताप्रमाणे हे संभाव्य आहे. पुढील गणनेत मार्गशीर्ष पौर्णिमा मृग नक्षत्राला व पौष पौर्णिमा पुष्य नक्षत्राला योग्य अशा स्थानी आपोआप येतात. तेव्हा सर्व घटनांचे काल कमीत कमी पण संभाव्य अशा तिथी–नक्षत्रांचे लोप करून येत असल्यामुळे ही कालगणना सर्वांत अधिक ग्राह्य आहे.

‘एक दिवसाआड युद्धाची’ सर्वस्वी चुकीची कल्पना

श्री. रा. ल. गोखले यांनी पन्नास वर्षापूर्वी मांडलेली वरील कल्पना उचलून धरतांना प्रा. ग. वा. कवीश्वरांनी जी विधाने केली आहेत ती चुकीची आहेत. रा. कवीश्वरांचे संस्कृत, ज्योतिष, गणित, विज्ञान व युद्धशास्त्र हे विषय नाहीत. त्यामुळे त्यांचे मूलगामी संशोधन मूलतः चुकीचे आहे.

त्यांनी दिलेले चित्रा नक्षत्र कार्त्तिक अमावास्येला, अनुराधा नक्षत्र मार्गशीर्ष अमावास्येला असंभाव्य आहे. पौष शुक्लात श्रवण नक्षत्र चतुर्थीच्या पुढे जात नसल्याने पंचमीला शक्य नाही. ज्या पक्षात पुरते पंधरा दिवस नाहीत तेथे नक्षत्र वाढ शक्य नाही. म्हणून त्यांनी तेरा दिवसांच्या कार्त्तिक वद्यात केलेली एकूण नक्षत्र वाढ चूक आहे.

संस्कृत शब्दांचे त्यांनी केलेले अर्थ बरोबर नाहीत. एका बाजूने प्रकाशाची छाया पडते व दुसऱ्या बाजूने पडत नाही या कल्पनेवर आधारलेले शुक्लचतुर्दशीच्या अंधाराचे स्पष्टीकरण मूर्खपणाचे आहे; असे म्हणणे भाग आहे. ‘संधि–प्रकाश’ या शास्त्रीय विषयाच्या संपूर्ण अज्ञानामुळे त्यांनी काढलेली सूर्यास्ताच्या वेळची अनुमाने अर्थहीन आहेत. सामान्य माणसास असणारे विज्ञानाचे ज्ञान, दुसऱ्यांच्या अज्ञानाची हेटाळणी करणारास असू नये याबद्दल आश्चर्य वाटते.

डॉ. दप्तरी, डॉ. काणे व डॉ. दांडेकर आदींचे कार्य

कार्त्तिक अमावास्येला ज्येष्ठा नक्षत्र होते व युद्धारंभ झाला ही कल्पना डॉ. दप्तरी, डॉ. काणे आदींची. त्या अनुषंगाने सर्व घटनांच्या

तिथ्या जुळतात. मी फक्त त्यांचे दुवे बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. दांडेकरांच्या ‘ भवितुम् अर्हति ’च्या स्वतंत्र कल्पनेचा मला फार उपयोग झाला.

आभार

ह्या विषयास चालना देण्याचे श्रेय इंदूरच्या संस्कृत कॉलेजचे प्राचार्य डॉ. कवठेकर यांस आहे. पण प्रत्यक्षात तो विषय लिहून काढण्यास महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांचे उत्तेजनच कारणीभूत झाले आहे. विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात छापून त्यांनी माझ्या कार्याचा गौरव केला आहे असे मी मानतो. ज्योतिषासाठी, ज्योतिषाचार्य रा. वि. उपासनी, आचार्य खजांची व ज्योतिर्गणितासाठी प्राचार्य पाळदीकर यांचा मी ऋणी आहे. विशेषतः विज्ञानाचे आचार्य पाळदीकर यांनी हा सर्व लेख संशोधिला आहे.

युद्धारंभ कार्त्तिक अमावास्येस ज्येष्ठाला मानल्यास खालील तालिका मिळते. यांत सर्व घटनांचे स्पष्टीकरण होते.

नक्षत्र	तिथी	मास व पक्ष		
रेवती	११	कार्त्तिक शुक्ल,	**श्रीकृष्णाचे उपप्लव्याहून प्रयाण.**	
अश्विनी	१२	तिथीची वृद्धी.	श्रीकृष्णाचे हस्तिनापुरात आगमन	
रोहिणी	१५	**पौर्णिमा**		श्रीकृष्णांचे हस्तिना- पुरात वास्तव्य
मृग	१	कार्त्तिक वध	या पक्षात दोन तिथि–लोप	
आर्द्रा	२		तेरा दिवसांचा पक्ष	
पुनर्वसु	४	तृतीयेचा लोप	(प्रथम तिथि लोप)	
पुष्य	५	श्रीकृष्ण–शिष्टाई.	दुर्योधन राजांस कुरुक्षेत्राकडे जा म्हणून सांगतो.	
आश्लेषा	६	श्रीकृष्ण कुंतीकडे.		
मघा	७	कर्णरथावर.	**श्रीकृष्णाचे हस्तिना**पुराहून प्रयाण	
पूर्वा	८	सेनापति नवमी नियुक्ती.	कुरुक्षेत्राकडे गमन	
हस्त	११	(दशमीचे, २ लोप).	खंदक, डेरे, तंबू आदि	
चित्रा	१२		युद्धव्यवस्था	
विशाखा	१३	(स्वाती नक्षत्र लोप)	बलराम–श्रीकृष्ण भांडण.	
अनुराधा	१४		**बलराम तीर्थयात्रेस** जातो.	
ज्येष्ठा	१५	**कार्त्तिक अमावास्या.**	युद्धारंभ	

उत्तराभद्रा	९	मार्गशीर्ष शुक्ल	(एक तिथी लोप)
रेवती	१०	भीष्मपतन.	युद्धाचा १० वा दिवस
अश्विनी	११	**मार्गशीर्ष** शुक्ल **एकादशी.**	गीताकथन. **गीताजयंती**
रोहिणी	१४	**जयद्रथवध**	**रात्री तीन वाजता, पुनः चंद्रोदय भरपूर**
पुनर्वसु	२	मार्गशीर्ष वद्य.	**प्रकाश** म्हणून युद्ध–संभव.
पुष्य	३	**दुर्योधनवध.**	**रात्री भरपूर प्रकाश.** अठरावा दिवस.
आश्लेषा	४	**युधिष्ठिराचा हस्तिनापुर प्रवेश.**	**प्रथम दिन.**
पुष्य	१५	पौष पौर्णिमा.	
धनिष्ठा	१५	पौष अमावास्या.	
रोहिणी	८	**माघ शुक्ल अष्टमी हस्तिनापुर प्रवेश ५० दिवस.**	**भीष्म–निर्वाण युद्धपतनानंतर ५८ दिवस**

जुनी पंचांगे पाहिल्यास, मार्गशीर्ष शुक्लात तिथीचा लोप (शके १८२२) तिथी–क्षयात कार्त्तिक वद्यांतील नक्षत्र–लोप संभाव्य आढळेल. (शके १८१६).